# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: ११ मे, २०२२

---

जळगाव दि.११ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाव्दारा ऑनलाईन मुलाखतींव्दारा हिमांशु इंगोले या विद्यार्थ्यांची आदित्य बिर्ला तलोजा कंपनीत निवड करण्यात आली आहे.

विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाव्दारा विविध कंपन्यांच्या परिसर मुलाखतींचे आयोजन करुन विद्यार्थ्यांना रोजगाराची सुविधा निर्माण करुन देण्यात येत असते. याचाच एक भाग म्हणून आयोजित केलेल्या ऑनलाईन मुलाखतींमध्ये विद्यापीठीय रसायन तंत्रज्ञान संस्थेतील बी.टेक. पेन्टस् मधील हिमांशु इंगोले या विद्यार्थ्याची आदित्य बिर्ला तलोजा कंपनीत निवड करण्यात आली आहे. या मुलाखती आयोजनासाठी रसायन तंत्रज्ञान संस्थेचे प्रा. रवींद्र पुरी, डॉ.उज्जल पाटील, प्लेसमेंट कक्षाचे समन्वयक प्रा.रमेश सरदार व प्लेसमेंट ऑफीसर सोनाली दायमा यांनी प्रयत्न केले. विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. व्ही.एल.माहेश्वरी, प्रभारी प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, संचालक जे.बी.नाईक, प्रभारी कुलसचिव प्रा.के.एफ.पवार यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्याचे अभिनंदन केले.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय देनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी